Navrashtra Mumbai Plus

# नानावटीमध्ये अपुऱ्या रक्ताची समस्या

## रक्तदात्यांच्या प्रमाणात ३० ते ४० टक्के घट

**मुंबई :** शहरातील नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला (एनएसएसएच) रक्ताची कमालीची कमतरता आढळली आहे. एप्रिल व मे या उन्हाळ्यांतील महिन्यांमध्ये रक्तदात्यांच्या प्रमाणामध्ये ३० ते ४० टक्के घट झाली आहे. नियमित रक्तदान करणारे शहराबाहेर गेले असल्याने एनएसएसएचच्या रक्तपेढीला फटका बसला आहे. शाळा व महाविद्यालयांना एक ते दोन महिने सुटी असल्याने आणि उन्हाळ्याच्या काळात विविध टूर कंपन्या देत असलेल्या सवलतींचा जास्तीत जास्त फायदा लोक घेत असल्याने या कालावधीत रक्ताची कमतरता जाणवते. "उन्हाळ्याच्या काळामध्ये रक्तदानापासून दूर राहण्याचा ट्रेंड रक्तदात्यांमध्ये सर्रास आढळतो.

परंतु, या वर्षी ही स्थिती फार गंभीर असून एप्रिल महिन्यात केवळ १९४ जणांनी रक्तदान केले आहे. ३०० दाते या सर्वसाधारण सरासरीपेक्षा ही संख्या फार कमी आहे," असे नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील रक्तपेढीच्या प्रमुख डॉ. रिंकू भाटिया यांनी सांगितले. दान केलेल्या रक्ताचे आयुष्य जास्तीत जास्त ४२ दिवस असते. त्यामुळे आम्हाला रक्तपेढीतील रक्ताचा साठा सतत वाढवावा लागतो.



अशा स्थितीत उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये रक्तदात्यांची संख्या कमी झाल्याने समस्या निर्माण होते, डॉ. रिंकू भाटिया यांनी नमूद केले. "अनेकांना सुटीच्या काळात शस्त्रक्रियांचे नियोजन करणे सोयीचे वाटते आणि हा काळ उन्हाळ्याचा असतो. त्यामुळे आम्हाला या कालावधीमध्ये अधिक रक्ताची आवश्यकता भासते. महाविद्यालयांमध्ये सुट्या असल्याने उन्हाळ्याच्या दरम्यान रक्तदान शिबिरांचे प्रमाण अत्यंत कमी असते.

### रक्तदान शिबिरांचे प्रमाण घटले

रक्ताची तातडीची गरज पूर्ण करण्यासाठी या सुपर स्पेशालिटी वैद्यकीय संस्थेने बाह्य रक्तपेढ्यांसोबत आणि अन्य रुग्णालयांसोबत करार केला आहे. रक्ताचा पुरवठा सुरळीत राहील, याची दक्षता घेण्यासाठी रुग्णालयाने रक्तदात्यांची यादीही सज्ज ठेवली आहे. उन्हाळ्याच्या काळात रक्ताचा तुटवडा असल्याचा अनुभव जगभर सर्वत्र येतो आणि रेड क्रॉससारख्या जागतिक आरोग्य संघटना या काळातील रक्तटंचाईचा सामना करण्यासाठी उन्हाळ्याच्या काळात रक्तदान व प्लेटलेट दान याची मदत घेत आहेत.